**कृपया प्रसिध्दीसाठी -** **संदर्भ : 406**

**6 डिसेंबर 2008**

## अजूनही पेट्रोलपेक्षा विमान इंधन स्वस्तच
## स्वयंपाकाचा गॅस स्वस्त न झाल्याने सामान्यांची घोर निराशाच - राम नाईक

**मुंबई, शनिवार** : "आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचा प्रति बॅरेल 147 वरुन 50 डॉलर्सपेक्षाही भाव खाली आला असल्याने पेट्रोल, डिझेल व स्वयंपाकाच्या गॅसची दरवाढ सरकारने मागे घ्यावी अशी सतत मागणी करुनही प्रत्यक्षात फक्त पेट्रोलचीच दरवाढ सरकारने मागे घेतली आहे. डिझेलवर प्रति लीटर तीन रुपये जास्त आकारले होते, परंतु आता दोन रुपयांनीच दर कमी केला आहे, तर स्वयंपाकाच्या गॅसचे दर जराही कमी न करुन पुन्हा एकदा काँग्रेसने सामान्य जनतेची घोर निराशाच केली आहे," अशी प्रतिक्रिया माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी दिली आहे.

"काँग्रेस सरकारने प्रति लीटर पेट्रोल रु.5 ने, डिझेल रु.3 ने तर स्वयंपाकाचा गॅस प्रति सिलेंडर रु.50/- ने जून 2008 मध्ये महाग केला होता. त्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात किंमती कमी झाल्याने पेट्रोल, डिझेल व स्वयंपाकाच्या गॅसचे वाढविलेले दर आठवड्याभरात कमी करु अशी घोषणा पेट्रोलियम मंत्री श्री.मुरली देवरा यांनी 23 ऑक्टोबर रोजीच लोकसभेत केली होती. प्रत्यक्षात मात्र हे सरकार श्रीमंतांच्या विमान इंधनाचे दरच कमी करत बसले. विमान इंधन पेट्रोलपेक्षाही स्वस्त केल्यामुळे सर्व बाजूंनी टीका होऊ लागल्यावर आता दर कमी केल्याचे सरकार दाखवित असले तरी हा दिलासा आंशिक आहे. डिझेल ची दरवाढही संपूर्ण मागे घेण्याची गरज आहे. स्वयंपाकाचा गॅस अजूनही महागच राहीला आहे," अशी टीकाही श्री.नाईक यांनी केली.

"डिझेलचे दर वाढले की मालवाहतूक आणि प्रवासी वाहतूक महागते. पर्यायाने जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढतात. महागाई वाढते. त्यामुळे डिझेलची दरवाढही पूर्ण मागे घेतल्याखेरीज सामान्य जनतेला खरा दिलासा मिळू शकणार नाही. त्याचप्रमाणे स्वयंपाकाच्या गॅसची दरवाढ कायम ठेवून खरं तर सरकारने जनतेची फसवणूकच केली आहे," असेही श्री.नाईक म्हणाले. विमान इंधन प्रति लीटर रु.40.69, तर पेट्रोल प्रति लीटर रु.50.07 आहे. म्हणजेच अजूनही विमानाचे इंधनच पेट्रोलपेक्षा स्वस्त आहे, याकडेही श्री.नाईक यांनी लक्ष वेधले. "काँग्रेसने आता कमी केलेले दर ही वरवरची मलमपट्टी आहे. जर सामान्य जनतेचा खरा कळवळा असेल तर जून 2008 मध्ये केलेली संपूर्ण दरवाढ मागे घ्यावी," अशी मागणीही श्री.नाईक यांनी पत्रकाच्या अखेरीस केली आहे.

**(कार्यालय सचिव)**